# B.A. (Part–I) Examination
# MODERN INDIAN LANGUAGES
# (Marathi)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

**सूचना :—** स्वीकृत माध्यमातून उत्तरे लिहा.

1. 'स्त्री-पुरुष असमानतेला केवळ पुरुष वर्गच जबाबदार नसून पुरुषसत्ताक व्यवस्थेची गुलामगिरी कळत नकळत स्वीकारणाऱ्या स्त्रियांची मानसिकता देखील जबाबदार आहे ? असे छाया दातार यांना का वाटते ?

**किंवा**

ईश्वर ह्या संकल्पनेविषयी राष्ट्रसंतानी व्यक्त केलेल्या विचारांचा परामर्श घ्या. 12

2. 'इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार' या पाठातून आगरकरांनी सामाजिक सुधारणे संबंधी कोणते विचार व्यक्त केलेत, स्पष्ट करा.

**किंवा**

'साक्षर कीं सार्थक' या पाठातून विनोबा भावे यांनी व्यक्त केलेल्या विचारांचा परामर्श घ्या. 8

3. 'दिवाळी' कथेतील जानकीचे व्यक्तिचित्र रेखाटा.

**किंवा**

'यश, आनंद किंवा उत्सव, साजरे करण्याच्या आपल्या प्रकारात साचेबंद एकसारखेपणा आल्याने खऱ्या समाधानापासून माणूस वंचित होत आहे' असे भा. ल. भोळे का म्हणतात ? 12

4. 'चटके' या कथेतून बाबाराव मुसळे यांनी तरूण पिढीला कोणता संदेश दिला. स्पष्ट करा.

**किंवा**

'महासर्प' या नाट्यछटे द्वारे निसर्गाला उद्ध्वस्त करण्याचे क्रौर्य करणाऱ्या माणसाला दिवाकरांनी कोणती समज दिली आहे. 8

5. सामाजिक समता व बंधुतेचे दर्शन 'नवा शिपाई' या कवितेतून कसे घडते, स्पष्ट करा.

**किंवा**

कर्जबाजारी शेतकऱ्याची अगतिकता 'लिलाव' या कवितेतून कशी व्यक्त होते ? 12

6. कर्मयोगी संत गाडगेबाबांच्या विभूतीमत्त्वाचा परिचय 'जीवनाचा चरिप्रवासी' या कवितेच्या आधारे करून द्या.

**किंवा**

संतांनी जनकल्याणासाठी सोसलेल्या वेदनेची जाणीव 'वेदनेचा वेद झाला' या कवितेतून कशी व्यक्त झाली आहे. स्पष्ट करा. 8

7. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा :

(1) संतांची सामाजिक शिकवण

(2) सर्वधर्मसमभाव

(3) वाढती व्यसनाधिनता : युवकांपुढील आव्हान

(4) निसर्ग संरक्षण : काळाची गरज. 10